जा.क्र. काउआ/आस्थापना/ १६२४
कामगार उप आयुक्त, यांचे कार्यालय,
बंगला नं. ५, पुणे मुंबई रस्ता,
शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.
दिनांक २०/०३/२०२०.
Email ID-dyclpune@gmail.com

प्रति,

मा. व्यवस्थापक,
सॉफ्टवेअर एक्सपोर्टस् असोसिएशन, पुणे.

**विषय :- कोरोना या विषाणूचा संसर्ग व प्रादूर्भाव रोखणेकरीता उपाय योजना.**

संदर्भ :- १. मा. जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे (आपत्ती व्यवस्थापन शाखा) यांचेकडील परिपत्रक क्रमांक- आव्यप्रकक्ष/कावि/१२२/२०२० दिनांक १५/०३/२०२०.
२. मा. जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे (आपत्ती व्यवस्थापन शाखा) यांचेकडील आदेश क्रमांक- जि.आ.व्य/कावि/१३८/२०२० दि.१८/०३/२०२०
३. मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचे परिपत्रक क्रमांक/ आपत्ती व्यवस्थापन कक्ष/ विआ/४१९/२०२० दिनांक १९/०३/२०२०.

उपरोक्त विषयी अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, संदर्भिय आदेशाव्दारे मा. जिल्हाधिकारी, पुणे जिल्हा पुणे यांनी आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ व महाराष्ट्र पोलीस कायदा, १९५१ मधील तरतूदीच्या अनुषंगाने कोरोना विषाणूचा संसर्ग व प्रादूर्भाव रोखणेबाबत तात्काळ नियंत्रण करणेकरीता गर्दीच्या ठिकाणी जाणे, वास्तव्य् करणे, सार्वजनिक संपर्क टाळणे इत्यादी बाबी अत्यावश्यक् असलेबाबत कळविले आहे.

संदर्भ क्रमांक-१ व ३ च्या परिपत्रकामध्ये व संदर्भ क्रमांक-२ च्या आदेशामध्ये **IT/Software/ Information Technology Enabled Services** या आस्थापनेमध्ये कार्यरत अधिकारी/ कर्मचारी यांना निवासस्थानातून ( Work From Home) कार्यालयीन कामे करणेबाबतची परवानगी देणेबाबतचा निर्णय घेण्याबाबत सूचना केलेल्या आहेत व आवश्यक् कामकाजाकरीता कर्मचारी/ अधिकारी यांना आळीपाळीने (Rotation) बोलवावे तसेच कामाच्या ठिकाणी ०५ किंवा ०५ पेक्षा अधिक व्यक्ती एकत्र येतील अशाप्रकारचे कामकाज करणेकरीता निर्बंध घालण्यात आलेले आहेत. तसेच आवश्यक कामकाजाकरीता कर्मचारी/ अधिकारी यांच्या उपस्थितीबाबत जिल्हाधिकारी कार्यालयास सूचित करणेबाबत निदेश दिलेले आहेत.

**IT/Software/ Information Technology Enabled Services** या क्षेत्रातील आपले सर्व सभासद आस्थापनांना आस्थापनांना आवाहन करण्यात यावे की, मा. विभागीय आयुक्त पुणे व मा. जिल्हादंडाधिकारी यांचे उक्त् आदेशाचे पालन करावे. सदर आदेशाचे पालन न केल्यास भारतीय दंड संहिता कलम १८८ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ अन्वये कायदेशीर कारवाई होऊ शकते ही बाब संबंधिताच्या निदर्शनास आणावी.

आपल्या प्रत्येक सभासद आस्थापनेस त्यांच्या आस्थापनेतील उपस्थित अधिकारी / कर्मचारी तसेच निवासस्थानातून ( Work From Home) कार्यालयीन कामे करणेबाबतची परवानगी दिलेल्या अधिकारी / कर्मचा-यांची माहिती सोबत जोडलेल्या google docs या Spread Sheet यावर तात्काळ भरण्याबाबत व उपरोक्त् नमूद ई-मेलवर पाठविणेबाबत कळवावे ही विनंती.

सोबत- संदर्भिय परिपत्रक, आदेश व गुगल लिंक.

(विकास पनवेलकर)
कामगार उप आयुक्त,
पुणे जिल्हा, पुणे.

Dycl-४६१/२०३२०२०

Scanned by CamScanner